# महाराष्ट्र शासन
# अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव

**श्री. गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर, शिरसोली रोड, जळगांव 425002**

ईमेल.gacjalgaon@gmail.com 0257-2996423


जा.क्र.शाआमज/भांडार विभाग/ खरेदी-23-24/2023/ 1690 दिनांक- 03 MAY 2023

**दरपत्रक सुचना दुसरी वेळ**

प्रति,

-----------------------

----------------------

**विषय- दरपत्रके सादर करणेबाबत.**

**संदर्भ- या कार्यालयाची दरपत्रक सुचना जा.क्र.शाआमज/भांडार विभाग/खरेदी/ 23-24/ 2023/1352, दि. 05.04.2023.**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भित पत्रान्वये प्रसिध्द केलेल्या दरपत्रक सुचनेनुसार या महाविद्यालयात सन 2019-20 ते सन 2022-23 मध्ये या आर्थिक वर्षात खरेदी करण्यात आलेल्या यंत्रसामुग्री/ साधनसामुग्री/साहित्य/ उपकरणे इ. वर नामांकन करण्यासाठी स्थानिक बाजार पेठेतील पेंटरकडून दरपत्रके मागविण्यात आली होती. मात्र विहित कालावधीत एकाही पुरवठादाराकडून दरत्रक महाविद्यालयास प्राप्त झालेले नाही.

यास्तव या महाविद्यालयात सन 2019-20 ते सन 2022-23 मध्ये या आर्थिक वर्षात खरेदी करण्यात आलेल्या यंत्रसामुग्री/ साधनसामुग्री/साहित्य/ उपकरणे इ. वर नामांकन करण्यासाठी स्थानिक बाजार पेठेतील पेंटरकडून पुन्हा दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी इच्छुक पेंटरने खालील नमुन्यात त्यांची दरपत्रके सादर करावीत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | नामांकन करावयाच्या वस्तुंची अंदाजित संख्या | प्रतीनग नामांकन करावयाचे दर |
|---|---|---|---|
| 1 | यंत्रसामुग्री/ साधनसामुग्री/साहित्य/ उपकरणे इ. चे नामांकन | 1500 | |

**दरपत्रक मागविण्याचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | बाब | कालावधी |
|---|---|---|
| 1 | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी | दि. 04.05.2023 ते दि.13.05.2023. (या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत, शासकीय व स्थानिक सुटटीचे दिवस वगळून ( सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत ) |

**अटी व शर्ती**

1. दिनांक 13.05.2023 रोजी सांय 5.00 वाजल्यानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
2. दरपत्रकाच्या पाकीटावर **नामांकन करण्यासाठी दरपत्रक** असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.
3. दरपत्रकात कोणत्याही प्रकारची खाडाखोड किंवा ओव्हररायटींग असता कामा नये.

   **आवश्यक त्या ठिकाणी दरपत्रकावर दिनांक व ठिकाण स्पष्टपणे नमुद करावेत.**
4. दरपत्रक सादर करणा-या दरपत्रकधारकाचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असू नये, तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील. याकरीता सोबत जोडण्यात आलेली हमीपत्र दरपत्रकधारकास सादर करणे बंधनकारक राहील. (**हमी पत्र विहीत नमुन्यात सादर करावे** )

5. दरपत्रक धारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे. दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रक धारकाचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्सक्ष संबध वा सहभाग नसावा. तसे आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येतील.
6. **दरपत्रकासोबत पॅनकार्ड, आधार कार्ड ची साक्षांकित झेरॉक्स प्रत सादर करणे आवश्यक राहील.**
7. दरपत्रकानुसार मंजुर करण्यात आलेल्या दराव्यतिरिक्त इतर कोणतेही दर देय होणार नाहीत.
8. शा.निर्णन उद्योग व उर्जा विभाग दि.01.12.2016 मध्ये नमूद केल्यानुसार पुरवठादाराच्या बाबतीत खरेदीच्या कोणत्याही टप्यावर अनियमितता /गैरप्रकार/नैतिक अध:पतन इतरही बाबी निदर्शनास आल्यास त्याबाबत शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.
9. पुरवठादाराने पुरवठा आदेशानुसार यंत्रसामुग्री/साधनसामुग्री/उपकरणे/वस्तु इ.चा पुरवठा विहित मुदतीत न केल्यास एल-2 क्रमांकाच्या दरपत्रक धारकाकडून सदर यंत्रसामुग्री/साधनसामुग्री/उपकरणे/वस्तु इ. खरेदी करण्यात येईल.
10. आपल्या देयकांची रक्कम ऑनलाईन पध्दतीने त्यांचे बँक खात्यात जमा करण्यासाठी विहित नमुन्यातील राष्ट्रीयकृत बँक खाते प्रमाणीकरण प्रपत्र, पॅनकार्ड झेरॉक्स प्रत देणे आवश्यक राहील. त्याशिवाय देयकाची रक्कम अदा करणे शक्य होणार नाही.
11. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव हे सदर दर पत्रक स्विकारणे, रद्दकरणे, यशस्वी दरपत्रक स्विकारणाच्या पूर्वी किंवा यशस्वी दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर देखिल कोणत्याही वेळी रदद करण्याचे अधिकार तसेच खरेदी प्रक्रियेच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार राखुन ठेवत आहे.
12. या दरपत्रकाद्वारे मंजुर करण्यात आलेले दर आदेशाच्या दिनांकापासुन 1 वर्षापर्यंत लागु राहतील. सदर कालावधीत आवश्यकतेनुसार वेळोवेळी याच दराने वस्तुंवर नामांकन करुन देणे बंधनकारक राहील.

अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय ,जळगांव.

**दरपत्रकासोबत जोडावयाच्या कागदपत्रांचा तपशिल.**

1. **पॅनकार्ड**
2. **आधार कार्ड**
3. **हमीपत्र-1 व हमीपत्र-2**

D:\santosh\backup\SANTOSH\backup files\Santosh Files\purchase\2023-24\Non Plan\2023-24 Quotation 1.docx3

## **हमीपत्र** -1 ( **Undertaking** )

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव.

मी,-------------------------------------------------- लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत यंत्रसामुग्री/साधनसामुग्री/उपकरणे/वस्तु इ. वर नामांकन करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी भाग घेत असून माझे किंवा माझ्या संस्थेचे खरेदी प्राधिकारी/खरेदी समिती वा कार्यालयाशी कोणत्याही प्रकारचे हितसंबध/संघर्ष नाहीत तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :
दिनांक :

पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित

.................................................................................................................................

## **हमीपत्र**-2 ( **Undertaking** )

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव.

मी ----------------------------------------लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत यंत्रसामुग्री/साधनसामुग्री/उपकरणे/वस्तु इ. वर नामांकन करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी/माझी संस्था केवळ एकच दरपत्रक सादर करीत आहे. त्याचप्रमाणे दरपत्रक प्रक्रियेत भाग घेण्या-या अन्य संस्थांसोबत माझा/माझ्या संस्थेचा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबध वा सहभाग नाही तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :
दिनांक :

पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित